# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/08/2023 (शनिवार) दुपार


### जबरी संभोग

**पो.स्टे. रामटेक** :— दिनांक ०१/११/२०२२ चे ००/०० वा. ते दिनांक ०१/११/२०२२ चे ००/०० वा. पर्यंत दिनांक ०८/०८/२०२३ रोजी पिडीता/फिर्यादीची डिलेवरी न्यु भोसरी हॉस्पीटल भोसरी पुणे येथे झाली असुन फिर्यादी/पिडीता अविवाहीत आहे व सध्या गेली दोन महिन्यांपासुन फिर्यादी व तिची आई हे बहिण हिच्याकडे राहण्यास आलेली आहे. फिर्यादी आपले मुळगावी राहण्यास असताना फिर्यादीची मैत्रीण ही फिर्यादीला म्हणाली की दिवाळी नंतरचे कार्तीक सणानिमीत्त आमचे काकाचे गावी रामटेक जि. नागपुर येथे यात्रा असल्याने तु माझ्या सोबत चल म्हणुन फिर्यादी सन २०२२ चे नोव्हेंबर महिन्यात असलेल्या कार्तीक यात्रेसाठी वाहीटोला ता. रामटेक जि. नागपुर येथे मैत्रीण हिचे काका यांच्याकडे राहण्यास गेले. माहे नोव्हेंबर/२०२२ मध्ये तिथे मुक्कामास गेले असता तेथे दिनेश आहाके व त्यांची पत्नी रेखा आहाके यांच्याकडे त्यांनी मुक्काम केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी जेवणखावन करुन फिर्यादी एका रुममध्ये झोपले असताना रात्री १२.०० वा. चे सुमारास आरोपी नामे— दिनेश आहाके रा. वाहीटोल ता. रामटेक जि. नागपुर याने रुममध्ये येवुन "तु मला खुप आवडते" असे म्हणुन फिर्यादीची इच्छा नसतांना जबरदस्तीने बलात्कार केला. फिर्यादीने त्यास विरोध केला असता त्याने फिर्यादीचे तोंड दाबुन ओरडलीस तर जीवे ठार मारील असे म्हणुन फिर्यादीवर अत्याचार करुन बलात्कार केला. त्याने फिर्यादीला जिवे मारण्याची भिती दाखविल्याने फिर्यादीने कोणास सांगीतले नाही. त्यानंतर दुसऱ्या दिवशी फिर्यादी त्याच रुममध्ये झोपली असताना त्याने रात्री येवुन पुन्हा फिर्यादीचा जबरदस्तीने बलात्कार केला. त्यानंतर फिर्यादी व तिची मैत्रिण असे चार ते पाच दिवस थांबले व तिचे मुळगावी निघुन आले. यानंतर झालेल्या प्रकाराबाबत भितीपोटी फिर्यादीने कुणासही काही सांगीतले नाही. तसेच दिनेश आहाके याने फिर्यादीवर अत्याचार केलेनंतर फिर्यादीला मासिकपाळी आली नाही त्यानंतर तीन महिने झाले तरी मासीक पाळी न आल्याने फिर्यादीने चेक केले असता फिर्यादी प्रेगनेंट असल्याचे लक्षात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३७६(२) (एन), ५०६ भा.द.वि सहकलम बालकांचे लैंगीक अत्याचारापासुन संरक्षण अधि. कलम ४, ५ (एल), ५ (जे) (२), ६, ८ व १२ कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक स्वाती यावले मॅडम पोस्टे रामटेक मो. नं. ७५८८८८१०८१ या करीत आहे.

# चोरी

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील शासकीय शितकरण केंद्र एमआयडीसी उमरेड येथे दिनांक ०८/०८/२०२३ चे ०६.०० वा. ते दिनांक ०९/०८/२०२३ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— दिनकर गुलाबराव ढेंगे, वय ५९ वर्ष, रा. अडयाळी हे दि. ०८/०८/२०२३ रोजी सायंकाळी शासकीय शितकरण उमरेड येथे कामाला गेले व काही वेळाने डेअरी उघण्याकरीता आले तेव्हा डेअरीच्या टिनाचे शेड मध्ये बाहेर ठेवलेले १४ अॅल्युमिनीयम कॅन कॅपेसिटी ४० लिटर प्रती कॅन ५००/— रू, प्रमाणे एकूण किंमती ७०००/—रू, आणि कंडेन्सर विदयूत मोटर पंप असा एकूण ७,५००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविंद्र वाघ मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील सेनेघाट येथे दिनांक ०९/०८/२०२३ चे १२.४० वा. ते दिनांक १०/०८/२०२३ चे ०८.०० वा. सुमारास पाणीपुरवठा कर्मचारी नामे— आशिष बालचंद झाडे याने फिर्यादी नामे— सौ. अपर्णा जयेंद्र वासनिक वय ३० वर्ष, रा. कवडक (दुधाळा), इंदीरा नगर गट ग्रामपंचायत सोनेघाट सरपंच यांना फोन करुन सांगितले कि, सोनेघाट शिवारात असलेल्या पाण्याच्या टाकीचे चढण्या उतरण्याकरिता लावण्यात आलेल्या ३ लोखंडी शिडी कोणीतरी काढून चोरी केले आहे. असे फिर्यादीला फोनवर सांगितले तेव्हा फिर्यादी व उपसरपंच निलकंठ महाजन यांनी पाण्याचे टाकीजवळ जावुन पाहणी केली तर टाकीला चढण्या उतरण्याकरिता लावलेली ३ लोखंडी शिडी किंमती ९०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लांजेवार पोस्टे रामटेक मो. नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**